**प्रेसनोट** **दि.२१/०६/२०१९**

## चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर

## गांजा या अंमली पदार्थाची विक्री करीत असतांना आरोपीस अटक

दिनांक १६/०६/२०१९रोजी दुपारी १६.०० वा. आम्ही स्वतः, पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड, पो.हवा.५४५ गायकवाड, पोहवा/५८१९ पारधी,पो.हवा.३८५३ जोशी,पो.ना.६७३८ साबळे, पो. शि. ८७७० गद्रे, पो.शि. ८७३७चोपडे असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. श्री. भास्कर जाधव व पोलीस निरीक्षक,गुन्हे, यांचे आदेशाने वटपौर्णिमा सणाचे अनुषंगाने चतुःश्रृंगी पो.स्टे. बालाजी चौक, पाषाण पुणे येथेपेट्रोलिंग करीत असताना पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांना त्यांचे बातमीदारकडुन बातमी मिळाली की,वाकेश्वर चौक, अमोल आईसक्रिम दुकाना जवळ, पाषाण सुस रोड पुणे येथे इसम नामे अनिल रमेश राजगुरु रा. एकतानगर, विजयानंद बंगलोजवळ, पाषाण पुणे हा त्यांचे ओळखीचे लोकांना अंमली पदार्थाची विक्री करत असल्याचे बातमी समजल्याने, पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांनी सदरची बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक.श्री. भास्कर जाधव व मा.पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती वैशाली गंलाडे यांना कळविली असता त्यांनी बातमीची खात्री करुन कार्यवाही करणेस सांगितल्याने पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांनी वरील स्टाफने मिळालेल्या बातमी प्रमाणे खात्री करून दि.१६/०६/२०१९ रोजी १७.२० वा. चे सुमारास, वाकेश्वर चौक, रस्त्यावर, अमोल आईसक्रिम दुकाना जवळ, सार्वजनिक ठिकाणी, पाषाण पुणे येथील सार्वजनिक रोडवर,इसम नामे अनिल रमेश राजगुरु वय ३० वर्षे रा. एकतानगर, विजयानंद बंगलोजवळ, पाषाण पुणे हा त्याचे ताब्यात किं. रु. १,२५०/- रु. चा १२५ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्याचे विरुध्द,चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.५७५/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(त्त)(ब), प्रमाणे गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आली आहे.वरील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर

## गुडवर्क ता.१९/०६/२०१९

दिनांक १९/०६/२०१९रोजीदुपारी १९.३० वा. आम्ही स्वतः, पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड, पो.हवा. ५३७५ खळदकर,पोलीस हवा.३८५३ जोशी,पो. ना.२०५३ आव्हाड,पो.ना.६९३८ साळवी, पो.शि ७५७२ शेख, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव यांचे आदेशाने चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्क पेट्रोलिंग कामी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीत खाजगी वाहनाने १९.३० वा. चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन ठाणे दैनंदिनी नोंद करुन रवाना होवुन चतुःश्रृंगी पो.स्टे. दसरा चौक, बालेवाडी पुणे येथेपेट्रोलिंग करीत असताना पोहवा ५३७५ खळदकर यांना त्यांच्या बातमीदाराने समक्ष येवुन बातमी दिली की, एक इसम,बालेवाडी मिटकॉन कॉलेजचे समोरी चौपटीवर त्यांचे ओळखीचे लोकांना गांजा अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची सांगितले. अशी खबर पोहवा ५३७५ खळदकर यांनी आम्हास कळविले त्यानंतर पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांनी सदरची बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक.श्री.भास्कर जाधव यांना कळविली असता त्यांनी सदरबाबत मा. सहा. पोलीस आयुक्त सोा खडकी विभाग पुणे यांना कळविली त्यानंतर त्यांनी कारवाई करणेबाबत तोंड आदेश दिलेबाबत मा. पो.नि. यांनी कळवुन पोलीस निरीक्षक, वैशाली गंलाडे यांचेसोबत त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे मिळालेल्या बातमीची खात्री करुन आवश्यक त्या कागदोपत्री बाबींची पुर्तता करुन सदर ठिकाणी जाऊन छापा टाकुन योग्यती कायदेशीर कारवाई करण्यास सांगितल्याने पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांनी वरील स्टाफने मिळालेल्या बातमी प्रमाणे खात्री करून दि. १९/०६/२०१९ रोजी २०.०५ वा. चे सुमारास, मौजे मिटकॉन कॉलेज, समोरील चौपटी जवळ बैगंलोर हायवेकडे जाणारे रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी, बालेवाडी पुणे इसम नामे **राबी योगेंद्र तिवारी वय २० वर्षे रा. बालेवाडी, गितांजली बालवडकर चाळ,बालेवाडी पुणेमुळगाव कॉगरा ठाणा-रामनगर तहसिल माणिकपुर जि. इलाबाद उत्तर प्रदेश** याने त्याचे ताब्यात कि. रु. **१५,१४०/- रु. चा ०१ किलो ०७४ ग्रॅम** गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आल्याने तसेच सदरचा गांजा हा आरोपीने उत्तर प्रदेश येथुन एक इसमकडुन नाव पत्ता माहित नाही त्याचेकडुन विक्रीसाठी आणला असल्याने त्यांचे गांजा विक्रीबाबत संगनमत असल्याचे दिसुन येत असल्याने आरोपी विरुध्द,,चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि

नं.५८८/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब), प्रमाणे गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आली आहे.वरील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर

## गुडवर्क ता.२०/०६/२०१९

दिनांक २०/०६/२०१९रोजी आम्ही स्वतः, पोहवा५४५ गायकवाड, पोहवा/ ५४५७ गुंड, पोहवा/५३७५ खळदकर, पोहवा/२२२१ तारु,पोलीस हवा.३८५३ जोशी,पो.ना.६७३८ साबळे, पो.शि. ७५७२ अमर शेख, पो.शि.८४३७ चोपडे असे **असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर जाधव यांचे आदेशाने चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्क पेट्रोलिंग कामी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीत खाजगी वाहनाने १८.१५ वा. चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन ठाणे दैनंदिनी नोंद करुन रवाना होवुन चतु:श्रृंगी पो.स्टे. दसरा चौक, बालेवाडी पुणे येथेपेट्रोलिंग करीत असताना** पायी पेट्रोलिंग करीत असताना, १८.२५ वा. चे सुमारास, डी मार्ट समोर, रोडचे डावे वाहणीवर बस स्टॉप शेजारी एकइसम त्याचे उजवे हातातलालरंगाचे पिशवीमध्ये काहीतरी घेवून उभा असलेलादिसला. तो आम्हा पोलीस स्टाफकडे पाहुन, तेथून लगबगीने जाण्याचा प्रयत्न करु लागला. त्यामुळे आम्हास त्याचेकडील पिशवीमध्ये काहीतरी संशयास्पद असल्याचा संशय आला. त्यामुळे तो तेथून पळुन जावू नये म्हणुन आम्ही पोलीस स्टाफने लागलीच त्यास जागीच १८.३० वा. चे सुमारास पकडले. **त्यानंतर पोलीस उप-निरीक्षक, श्री तुकाराम फड यांनी सदरची बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक.श्री.भास्कर जाधव यांना कळविली** असता त्यांनी सदरबाबत मा. सहा. पोलीस आयुक्त सोा खडकी विभाग पुणे यांना कळविली त्यानंतर त्यांनी कारवाई करणेबाबत तोंडी आदेश दिलेने **की** दि. २०/०६/२०१९ रोजी १८.२५ वा. चे सुमारास, डी मार्ट समोर, रोडचे डावे वाहणीवर बस स्टॉप शेजारी सार्वजनिक ठिकाणी, बाणेर पुणे इसम नामे **राजेश सुरेश राऊत वय ३५ वर्षे रा. पाडाळे हाईटस, म्हाळुंगे हिजंवडी पुणे** याने त्याचे ताब्यात कि. रु. १५,५५०/-रु. चा ०१ किलो २१८ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आला. तसेच सदरचा गांजा हा ताडीकंद विशाखापट्टनम येथुन एक इसमकडुन नाव पत्ता माहित नाही त्याचेकडुन विक्रीसाठी आणला असल्याने त्यांची गांजा विक्रीबाबत संगनमत असल्याचे दिसुन येत आहे.त्यामुळे १. ताडीकंद विशाखापट्टनम व त्याचा साथीदार असे दोघांचे विरुध्द,,चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.५९०/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब), प्रमाणे गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आली आहे.वरील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर